**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. १</u>** **<u>नि.दि.दा.क्र.८०/२०१९</u>**

**शरद विरुध्द पी. बी. यादव**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की,** **निशाणी – १८ पुढे चालू**

## उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री. कुशवहा यांच्यातर्फे

१६. सदरची केस खोली खाली करण्यासाठी व किरायासाठी दाखल केली आहे. दावा मिळकतीचा नंबर १५५ असेल. प्रतिवादीचे पुर्ण नाव मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादीचा माझ्या वडीलांसोबत भाडयाचा व्यवहार झाला होता. माझे वडील दि.१५.०५.२००९ रोजी मयत आहे. हे म्हणणे खरे आहे की वडीलांच्या हयातीत त्यांनी प्रतिवादी विरोधात कोणतीही केस दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी दावा मिळकतीमध्ये मालक नात्याने राहतात. माझे वडील व प्रतिवादी यांच्यामध्ये भाडयाचा करार झाल्याबाबतचे कागदपत्र मी दाखल केलेले नाही. माझ्या वडीलांच्या मृत्यूनंतर मी व माझ्या भावाने प्रतिवादी सोबत कोणताही भाडयाचा करारनामा केलेला नाही. प्रतिवादी माझ्या वडीलांचे भाडेकरू होते याबाबत भाडयाची पावती दाखल केली नाही. वडीलांच्या मृत्यूनंतर प्रतिवादीसोबत मी व माझ्या भावाने करारपत्र केले किंवा प्रतिवादीला भाडयाची पावती दिल्याबाबत कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी व प्रतिवादीने कोणतेही किरायापत्र बनविले नाही. वडीलांच्या मृत्यूनंतर प्रतिवादीला किरायाबाबत कोणतेही पत्र किंवा नोटीस पाठविले नाही. मी दावा मिळकत बघितली आहे. त्यामध्ये एका छोटया रूममध्ये फोटो स्टूडीओ आहे. तो स्टूडीओ यादव नावाचा व्यक्ती चालवितो, त्याला प्रतिवादीने ठेवले आहे. हे म्हणणे खरे आहे की यादव यांना मी ओळखतो, ते कन्हानचे रहिवासी आहे. हे म्हणणे खरे आहे की यादव फोटोग्राफर  या प्रकरणात प्रतिवादी नाही. फोटोग्राफर यादव सोबत आमचा कोणताही वाद नाही. प्रतिवादीसोबत वाद असल्याने त्यांना पक्षकार केले. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीमध्ये पी. पी. यादव नावाचे वकीलांचे कार्यालय आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने माझ्या वडीलांकडून दावा मिळकत करारपत्राने खरेदी केले आहे. हे म्हणणे खरे नाही की नोंद खरेदी पत्र करण्यापुर्वी माझे वडील मयत झाल्याने तसे खरेदी पत्र तयार झाले नाही. माझ्या आईने दावा मिळकतीमधील दुकानाचे बांधकाम केले नाही. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत असलेल्या जागेशेजारील सहा दुकांनांची विक्री झाली आहे. साक्षीदार सांगतो की दवा मिळकत विकली असल्याचे आम्हाला वाटल्याने आम्ही प्रतिवादीकडून किराया मागितला नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांनी दावा मिळकत प्रतिवादीला विकली आहे. मी माझ्या वडीलांना ते हयात असताना दावा मिळकतीची विक्री झाली का याबाबत विचारणा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांनी मला दावा मिळकत प्रतिवादीला विकली असल्याचे सांगितले होते.

१७. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीचा किराया किती होता याची मला माहिती नाही.

हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादीला आम्ही किराया देणेबाबात नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी दावा मिळकतीमध्ये मालक म्हणून कब्जामध्ये होते. प्रतिवादीकडे मी कोणत्या तारखेला किरायाची रक्कम मागितली होती हे सांगू शकत नाही मात्र २०१६ मध्ये रक्कम मागितली होती.

१८. प्रतिवादीचा १० x १५ क्षेत्राच्या दुकानात कब्जा आहे. माझ्या मालकीचे सभागृह आहे. त्याचे क्षेत्र ४००० चौ.फुट आहे व ते दोन मजली आहे. हे म्हणणे खरे आहे की सभागृहाची जागा मला पुरेशी आहे. मी कॅटरर्स चे काम करतो. ते काम आम्ही हॉल मध्ये करतो. मी कॅटरर्सचे काम २००० साला पासून करतो. हे म्हणणे खरे नाही की या व्यवसायाव्यतिरीक्त दुस–या व्यवसायाचे मला ज्ञान नाही. हे म्हणणे खरे आहे की २००० नंतर सभागृह सोडून मी दुसरा व्यवसाय केलेला नाही. साक्षीदार सांगतो की त्यापुर्वी मी दुसरा व्यवसाय करत होतो. हे म्हणणे खरे नाही की सन २००० नंतर मला दुसरा व्यवसाय करण्यासाठी वेळ मिळत नाही.

१९. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी दावा मिळकतीचे भाडेकरू नसून मालक आहे. मी अभिलेखावर दावा मिळकत अस्तीत्वात असलेल्या परिसरात दर महिन्याचे रू.४०००/– भाडे मिळते असे दाखविण्यासाठी कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. दि.०६.१२.२०१८ रोजी मी काय केले होते हे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी कडे दावा मिळकत सोडून त्यांच ऑफिस सुरू करण्यासाठी दुसरी मिळकत नाही.

२०. मला एक भाउ व सहा बहीणी आहे. माझ्या बहीणींनी दावा मिळकतीमध्ये हक्क सोडलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने माझ्या वडीलांना विक्रीपत्राची सर्व रक्कम दिली आहे मात्र ते मयत झाल्याने नोंद विक्रीपत्र झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की या व्यवहाराची सर्व माहिती माझा भाउ शरद यांना आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने मला पुर्ण रक्कम दिली आहे, रजिस्टर करून दया असे मला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की माझा भाउ शरद याने माझी व बहीणींची परवानगी घेउन रजिस्ट्री करून देतो असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की फोटो दुकान चालवत असलेल्या व्यक्तीचे नाव कमल यादव असे आहे.

२१. हे म्हणणे खरे आहे की तहसिलदार यांनी दि.१५.१०.२०१८ व २४.१०.२०१८ रोजी दावा मिळकत अतिक्रमणामध्ये येत असल्याने पाडून टाकावे अशी नोटीस पाठविली आहे. हे म्हणणे खरे नाही की सदरच्या नोटीस घेउन प्रतिवादी माझा भाउ शरद यांच्याकडे गेले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यांनी दावा मिळकती बाबत अतिक्रमण चा वाद मिटल्यानंतर रजिस्ट्री करून देतो असे त्यांनी सांगितले होते. माझ्या वडीलांच्या नावे एकूण ३२ आर क्षेत्राची मिळकत होती. हे म्हणणे खरे आहे की या ३२ आर क्षेत्रामध्ये सभागृह बनले आहे. तहसिलदार यांनी पाठविलेली नोटीस मला

मिळाली होती का हे मला आता आठवत नाही. दावा मिळकत माझ्या मालकीची असल्याबाबत कमिशनर नागपूर यांच्याकडे प्रकरण दाखल केले आहे का याची मला माहिती नाही.

**न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**फेरतपासणी नाही**.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT

Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2026.03.11 11:02:44 +0530

कामठी
दिनांक १०/०३/२०२६

( एम.आर. कामत )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी